# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/अंतरिम कंस क्र.६३/२०१४-१५/२०९ दिनांक : १८.१०.२०१४

**आदेश केस क्र. ६३/१४-१५**

प्रति,
कै. मारुती भाऊ लोहार,
भोगवटदार श्री. दिगंबर श्रीकांत लोहार, - अर्जदार
रा. यवलूज, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता, विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
ग्रामीण १ विभागीय कार्यालय, कोल्हापूर.

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, कळे.

## अंतरिम आदेश

तक्रारदार श्री. दिगंबर श्रीकांत लोहार हे मयत ग्राहक कै. मारुती भाऊ लोहार यांचे वीज कनेक्शनचे भोगवटदार वारसापैकी एक वारसदार आहेत. वितरण कंपनीने ग्राहकास दोन स्वतंत्र वीज कनेक्शन्स दिल्याचे तक्रारीत नमूद केले आहे त्याचे क्रमांक (१) २६२०४०००७४५२ व (२) २६२०४०००६९७९ असे आहेत. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर येथे दि.१५.०९.२०१४ ला संबंधित दोन कनेक्शन्स थकबाकी नसतांना तोडल्याबद्दल व भरपाई मिळणेसाठी तक्रार दाखल केली. या दोन्ही कनेक्शन्सचा वीज वापर अर्जदार भोगवटदार करीत आहेत व त्याची वीज बीले भरत आहेत. उप कार्यकारी अभियंता, उप विभाग, कळे, कनिष्ठ अभियंता, पडळ यांना कायदेशीर आदेश नसतांना व नोटीस न देता, ग्राहकास न कळविता वीज कनेक्शन्स कायमस्वरुपी बंद केली आहेत. त्यामुळे वीज पुनर्जोडणी मिळावी व भरपाई मिळावा यासाठी अर्ज केला आहे.

सदर कनेक्शन भोगवटदार यांचे आजोबांचे नांवे असलेल्या सॉ मील व्यवसायाचे वीज वापरासाठी होत असतो. अर्जदाराचे वडिलांचे भाऊ श्री. कृष्णात मारुती लोहार यांनी दि.०७.०४.२०१४ रोजी कळे उप विभागीय कार्यालयास सदरची कनेक्शन्स कायमस्वरुपी बंद करण्यासाठी पत्र दिले. त्यामुळे बंद केलेली वीज कनेक्शनची पुनर्जोडणी मिळावी यासाठी भोगवटदार यांनी मंचाकडे दि. १५.०९.२०१४ ला अर्ज केला.

वितरण कंपनीला दि. २५.०९.२०१४ ला लेखी अहवाल देण्यासाठी नोटीस दिली, तो दि. १०.१०.२०१४ ला प्राप्त झाला. वि.प.ने लेखी अहवालासोबत कागदपत्रे जोडली आहेत. मयत कै. मारुती भाऊ लोहार यांचे एक वारस श्री. कृष्णात मारुती लोहार यांनी सदरची कनेक्शन्स कायमस्वरुपी बंद करणेसाठी दि. ०७.०४.२०१४ ला अर्ज दिला. दि. ३०.०६.२०१४ ला शाखा कार्यालय, पडळ यांनी सदरच्या कनेक्शन्सचा विद्युत पुरवठा बंद करण्याचे आदेश दिले. कनेक्शन्सचा वापर करीत असलेल्या लोकांना पूर्व सूचना देण्यात आली होती. तक्रारदार भोगवटादार यांनी दि. १६.०९.२०१४ ला वीज कनेक्शन्स पूर्ववर करण्यासाठी कागदपत्रे जोडून मागणी केली आहे. कै. श्रीकांत मारुती लोहार, रा. यवलूज, ता. पन्हाळा यांचे नांवे असलेला उप वन संरक्षक, कोल्हापूर वन विभाग यांचेकडून मंजूर असलेला आरा गिरणी परवाना २०१४ साला करीता नूतनीकरण झालेले नाही. तक्रारदार यांनी दि. ०९.०७.२०१४ ला प्रतिज्ञापत्र देऊन हरकत आल्यास वि.प.ने कनेक्शन बंद केल्यास तक्रार करणार नाही व वि.प. ला जबाबदार धरणार नाही असे नमूद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर घेण्यात आली, त्यावेळी तक्रारदार हजर. वि.प. तर्फे श्री. विजय माळी, सहाय्यक अभियंता, ग्रामीण विभाग १, कोल्हापूर उपस्थित. तक्रारदार यांनी वीज बीले नियमित भरली आहेत. आरा गिरणी परवाना नुतनीकरणासाठी उप वनसंरक्षक, कोल्हापूर वन विभाग यांचेकडे अर्ज केला आहे, तो प्रोसेसमध्ये असून नागपूरच्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला आहे. श्री. कृष्णात मारुती लोहार हे एमएसईबी मध्ये ज्युनि. इंजिनीअर पदावर कुडित्रे शाखा कार्यालयात कार्यरत होते, त्यांच्या अर्जावर नोटीस न देता विद्युत पुरवठा खंडित केला तो पूर्ववत सुरु करुन मिळावा अशी मागणी केली आहे.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे सदर कनेक्शनचा विद्युत पुरवठा पूर्ववत जोडून देण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

प्रस्तुत केसमध्ये ज्यांच्या नांवे कनेक्शन आहेत ते मयत आहेत. भोगवटदार श्री. दिगंबर श्रीकांत लोहार यांचे एक हिस्सेदार आहेत. श्री. लक्ष्मण भाऊ लोहार यांनी रे.क.नं. २५१/२००० नुसार दिवाणी न्यायालय, पन्हाळा येथे त्यांचे भाऊ यशवंत व इतर वारसदार आणि कै. मारुती भाऊ लोहार यांचे वारसदार प्रतिवादी क्र. २५, २६, २७ पत्नी व दोन मुले कृष्णात व श्रीकांत. श्री. कृष्णात मारुती लोहार १/६ वाटणीवरुन ताबा मिळावा असा दावा केला आहे. त्या वादातील वीज कनेक्शन एक प्रॉपर्टी म्हणून वर्णनात उल्लेख आहे. भोगवटादार यांचे वडील श्रीकांत यांनी सदरचा हूकूमनामा व आदेशाविरुध्द अपील केले नाही. परंतु डिक्री होल्डर यांनी आपला १/६ हिस्सा विभक्त करुन मिळावा त्या निकालाची कोर्टामार्फत कमिशनर नेमून Execution मागितले नाही. सदर प्रॉपर्टीमध्ये भोगवटादार हे सह हिस्सेदार आहेत.

तसेच दरम्यानचे उत्पन्नाबाबत स्वतंत्ररित्या CPC ऑर्डर २०/१२ नुसार करण्यात यावी असे आदेश दिले. त्यामुळे प्रथम भोगवटदार व तथाकथित श्री. कृष्णात मारुती लोहार सदर दाव्यात सहवादी आहेत. श्री. कृष्णात याला स्वेच्छेने कायमस्वरुपी विद्युत पुरवठा खंडित करण्याचा अधिकार नाही, अशी मागणी त्यांना करता येणार नाही, जोपर्यंत त्यांच्या प्रॉपर्टी, जागा व गिरणीत त्यांचा हिस्सा ठरत नाही. त्यामुळे वि.प. चा बचाव श्री. कृष्णात मारुती लोहार यांच्या अर्जावरुन केलेली कार्यवाही योग्य आहे हे कायदेशीर नाही त्यासाठी वि.प.ने सहहिस्सेदार जो डिक्रीत लाभधारक आहे किंवा प्रत्यक्षात भोगवटदार आहे त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक होते. तसे न केल्याने व वीज बील थकबाकी नसतांना अचानकपणे विद्युत पुरवठा खंडित करणे निश्‍चितपणे कायदेशीर नाही. दुसरा बचाव २०१४ सालाकरिता आरा गिरणीचा परवाना नुतनीकरण केलेला नाही. अर्जदाराने उप वन संरक्षक, कोल्हापूर वन विभाग यांचेकडे दि. ०६.१२.२०१३ रोजी त्यासाठी अर्ज केलेला आहे. सदर नुतनीकरण प्रोसेसमध्ये असून नागपूर वरिष्ठ कार्यालयाकडे प्रलंबित आहे असे सांगितले. कदाचित नुतनीकरण फेटाळण्यास वितरण कंपनी किंवा वन खाते संबंधित आरा गिरणीबाबत कारवाई करतीलही, परंतु वि.प.ला चालू असलेला विद्युत पुरवठा या कारणावरुन तूर्ततरी खंडित करता येणार नाही. मुद्दा क्र. १ चे उत्तर ' होय 'असे देणेत येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## <u>आदेश</u>

१) तक्रार मंजूर करणेत येत आहे.

२) तक्रारदार भोगवटदार यांनी रिकनेक्शन चार्जेस वितरण कंपनीकडे हा आदेशा मिळाल्यापासून ७ दिवसांत भरावेत.

४) वितरण कंपनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग १, कोल्हापूर यांनी वादातील दोन कनेक्शन पूर्ववत स्थितीत करुन ग्राहकाने रिकनेक्शन चार्जेस भरल्यानंतर १० दिवसांत त्यांस विद्युत पुरवठा करावा. तसा अहवाल मंचास द्यावा.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (जी.बी.पानकर) | (जी.सी.लेले) | (बी.जी.पवार) |
| सदस्य सचिव | ग्राहक सदस्य | अध्यक्ष |

e